# उ प सं हा र

# उ प सं हा र

शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनांचे स्वरूप "अक्करमाशी" व "बारामाशी"च्या अनुषंगाने अभ्यासणे प्रस्तुत प्रबंधिकेचा उद्देश आहे. ही दोन्ही पुस्तके दलित साहित्यात मोडणारी व आत्मकथनाच्या स्वरूपाची असल्यामुळे त्यांचे स्वरूप तपासण्याआधी दलित वाङ्मयाचे स्वरूप व आत्मचरित्रपर वाङ्मयाची वैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक होते. म्हणून पहिल्या प्रकरणात दलित साहित्याची प्रेरणा, स्वरूप वैशिष्ट्ये व आत्मचरित्रपर लेखनाचे विशेष यांचा विचार केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि विचारप्रणाली हीच दलित साहित्याची प्रेरणा आहे. दलित साहित्याच्या स्वरूपाविषयी एक भूमिका नकार, विद्रोह यांना प्राधान्य देणारी, जन्मजात अस्पृश्यतेला महत्व देणारी आहे, तर दुसरी, आर्थिक शोषणातच महत्व देणारी आहे. या द्विविध भूमिकांचा विचार या प्रकरणात केला आहे. याचबरोबर दलित आत्मकथने आत्मचरित्रपर वाङ्मयाला अतिशय जवळची असल्यामुळे आत्मचरित्रपर वाङ्मयाच्या लेखकाच्या सत्यकथन, तटस्थवृत्ती, प्रांजळपणा, "स्व"ला केंद्रस्थान, घटनांची निवड, कलात्मक मांडणी इत्यादी वैशिष्ट्यांमुळे अशा लेखनाची गुणवत्ता कशी वाढते याचा येथे विचार केला आहे. त्याबरोबरच दलित आत्मकथनांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

दुसऱ्या प्रकरणात "अक्करमाशी" व "बारामाशी" मधील अनुभवविश्वाचे स्वरूप ध्यानात घेतले आहे. कौटुंबिक पातळीवरचे अनुभव पहात असताना बालवयातच आईपासून दूर राहण्याची पाळी शरणला येते. आजीच्या सहवासात रहात असताना भूक उपासमार व दारिद्र्याला तोंड द्यावे लागते. तरीही एकमेकांच्या मायेनं बध्द असणारी ही माणसे एकमेकांना सावरून धरतात. तर "बारामाशी" मध्ये स्तर बदलामुळे आपल्या आप्तस्वकियांच्यापासून तुटलेपणा

लेखक अनुभवताना दिसतो. सामाजिक अनुभवामध्ये लेखक आपल्या समाजामध्ये अक्करमाशी म्हणून हीनला जातो तर सवर्णांमध्ये तो अस्पृश्य हिणवला जातो. अवतीभोवतीचा सर्व आसमंत त्याला नकार देतो. आपल्या समाजाची असह्य भूकही त्याच्या अनुभवातून पहावयास मिळते. "बारामाशी"मध्ये स्वसमाजा-पासून दूर जात असल्याची खंत दिसून येते. गरिबीचं गहिरं दु:ख पचवून शिक्षण घेण्याची शरणाची जिद्द कौतुकास्पद वाटते. शिक्षण घेतानाही त्याच्या अस्तित्वाला हीनवले जाते. तरीही शरण शिक्षणामुळे स्वाभिमानी होतो, त्याच्यातील ख-या "स्व"ची जाणीव त्याला येताना दिसते. चळवळीविषयक अनुभवामध्ये लेखकाला नामांतर आंदोलनाच्या दहशतीमुळे आपली जात लपवावी लागते. तसेच चळवळीमुळे त्याच्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळताना दिसते. एक दलित साहित्यिक म्हणून तो उदयाला येतो. चळवळीमध्येही त्याला "अक्करमाशी" असल्याची वेदना असह्य करते. "बारामाशी" मध्ये लेखक स्तर बदलामुळे चळवळीशी नाममात्र संबंध ठेवताना दिसतो व चळवळीकडे चैनीची वस्तू म्हणूनही पाहतो. लेखकाच्या या अनुभूतीमधून मानसिक व वर्तनाचे दुभंगले-पण दिसून येते. आपल्या दोन्ही आत्मकथनांमधून लेखकाला काही व्यक्तींच्या-कडूनही अनुभव येतात. त्यामध्ये मातेचं प्रेम देणारी संतामायी, बापाचं प्रेम देणारा महामुद दस्तगीर जमादार, दुर्दैवी माता मसामायी, दलित स्त्री अन्न भोगणारे खल पुरुष हणमंता लिंबाळे व यशवंत पाटील, भावी आयुष्याचे अधुरे स्वप्न - शेवंता, मनाची व वर्तनाची दुभंगलेपणाची जाणीव करून देणारा दिनेश कांबळे व मैत्रीचा वेगळा आनंद देणारा जोशा, स्वाती, मेधा, निलू, रत्ना, नसरीन - असफल प्रेमानुभूती अशा अनेक व्यक्तींच्याकडून बरे-वाईट अनुभव येतात. अशाप्रकारे लेखकाच्या अनुभवविश्वाचे स्वरूप उलगडून दाखवले आहे.

तिस-या प्रकरणात "अक्करमाशी" व "बारामाशी" या पुस्तकांच्या भाषाशैलीचा विचार केला आहे. सीमा प्रदेशातील बोली, नागरबोली,

निवेदन पध्दती, संवादांची भाषा, यांच्यामध्ये लेखकाने वास्तव्य असलेल्या प्रदेशाच्या बोलीचा वापर केला आहे. दलित समाजाच्या भाषिक व्यवहारातील प्रचलित शब्द, दलित समाजातील रूढी परंपरांचा परिचय, छोटया आशयघन वाक्यरचनेतून साकारणारी समाजव्यवस्था, शैलीचा तिरकसपणा आणि उपरोधातून दिसणारी समाजव्यवस्था या सर्वांमधून प्रस्तुत आत्मकथनांच्या भाषाशैलीतून सामाजिक व सांस्कृतिक स्तर व्यक्त होताना दिसतो. तसेच या आत्मकथनांमध्ये ग्रांथिक भाषा आणि महारी बोलीचा वापर कौशल्याने झालेला दिसतो. दृक् प्रत्यय, प्रतीकांचा व प्रतिमांचा यथायोग्य वापर, लयबध्दता, दृष्टांत व जातककथेचा वापर यामुळे "अक्करमाशी"ची भाषा प्रत्ययकारी झाली आहे. अशा बाबींचा विचार येथे केला आहे.

चौथ्या प्रकरणात "अक्करमाशी" व "बारामाशी"च्या वाङ्मयीन गुणवत्तेचा विचार केला आहे. लेखकाच्या वाटयाला आलेले जीवन म्हणजे एक दिव्य आहे. त्यामुळे आपल्या मर्यादित आयुष्यातील दुःखभोगांची अभिव्यक्ती प्रस्तुत आत्मकथनांमधून प्रांजळ स्वरूपात शब्दबध्द झालेली दिसते. जिवलग मित्राशी बोलतो आहोत अशा भावनेने स्वतःच्या आयुष्याची कथा लेखक वाचकांना सांगतो. त्यामुळे लेखक व वाचक यांच्यामध्ये एक प्रकारचा जिव्हाळा निर्माण होतो. इतका प्रांजळपणा या आत्मकथनांमध्ये आलेला आहे. या आत्मकथनांमधून आलेली व्यक्तिचित्रे महार समाजाचे चित्र अधिक स्पष्ट करण्यास उपयोगी ठरली आहेत. लेखकाच्या निवेदन कौशल्याची सोदाहरण चर्चा केली आहे. आशयाच्या उत्कटतेमुळे "अक्करमाशी"चे लेखन टोकदार झाले आहे. त्यातून लेखकाच्या भीषण आयुष्याची नोंद झाली आहे. "बारामाशी"मधील निवेदनातून लेखकाच्या जुन्या-नव्या जीवनाचे द्वंद्व सतत भेटत राहते. आत्मकथनांमधील प्रसंग लेखकाच्या प्रामाणिक निवेदनामुळे परिणामकारक ठरलेले आहेत. असे असले तरीही या आत्मकथनांना मर्यादा पडलेल्या आहेत.

लेखक संयमाने, सत्यपूर्ण व प्रत्ययकारीरीतीने आपले जीवनदर्शन वाचकांना घडवितो तेव्हा वाचकही अस्वस्थ होतो व अंतर्मुख होऊन विचारप्रवण बनतो. असे जीवनचित्रण रेखाटण्यात लेखकाचा जीवनविषय संमजस दृष्टिकोण, वृत्तीचा व्यापकपणा व मनाची प्रगल्भता प्रकट होते. ह्या गुणवैशिष्ट्यांमुळेच वाचकांच्या मनावर विलक्षण प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य लिंबाळे यांच्या लेखनात निर्माण झाल्याचे दिसते.

........

## संदर्भग्रंथ-सूची (अ)


१. क-हाडे, सदा - चरित्र आणि आत्मचरित्र, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय प्रकाशन गृह, प्रा.लि., मुंबई ४.

२. कालेलकर, ना.गो. - भाषा आणि संस्कृती, दु.आ. मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८२.

३. कुलकर्णी, वा.ल. - वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी, ति.आ. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७०.

४. जाधव, रा.ग. - निळी पहाट, प्र.आ., श्रीविद्या प्रकाशन,पु णे, १९७८.

५. धोंगडे, रमेश - दलित आत्मचरित्रे : साहित्य आणि समाज, मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे, १९९२.

६. नेमाडे, भालचंद्र - टीकास्वयंवर, प्र.आ. साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.

७. फडके, भालचंद्र - दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, प्र.आ. श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७.

८. भालेराव, विमल - आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास, प्र.आ. साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९८६.

९. मुलाटे, वासुदेव - सहा दलित आत्मकथने : एक चिंतन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९८५.

टीप : प्रस्तुत प्रबंधिकेसाठी याही संदर्भग्रंथांचा अप्रत्यक्षपणे उपयोग झाला.


१. कवठेकर, बाळकृष्ण - दलित साहित्य एक आकलन, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्र.आ. १९८१.

२. कुसरे, आरती - दलित स्वकथने : साहित्य रुप, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९१.

३. देशपांडे, अ.ना. - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला : १८७४ ते १९५०, पुनर्मुद्रण, १९७०.

४. गो.मा. पवार व म.द. हातकणंगलेकर - संपा. "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप" पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८६.

५. पवार, दया - बलुतं, ग्रंथाली प्रकाशन, कुर्ला, मुंबई, प्र.आ. १९७८.


.............

नियतकालिके


१) "अनुष्टुभ" - दलित आत्मकथा, अशोक पाटील, जु.- ऑ., १९८१.

२) "युगवाणी" - पंचवीस वर्षातील मराठी आत्मचरित्रे - डॉ. द.भि. कुलकर्णी, जून-जुलै, १९८०.

३) "सत्यकथा" - आत्मचरित्र काही विचार, आनंद साधले, डिसेंबर, १९७२.


:::::::::